SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 3 1 0 4 दि. 02 JUL 2025

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए/बी.सी.ए व अन्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे शुल्क अर्ज महाडिबीटी पोर्टलवर जमा करणेबाबत.

संदर्भ :- १. जा.क्र. प्रोफेशनल असोसिएशन/२३४/२०२५, दि.०३/०६/२०२५ रोजीचे पत्र

२. जा.क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/१४७, दि.१०/०३/२०२५ रोजीचे पत्र.

३. जा.क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.२०/०५/२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या संस्थाना/महाविद्यालयांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.बी.ए/बी.सी.ए व एम.बी.ए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांना मान्यता दिलेली आहे. अशा संस्थांनी/महाविद्यालयांनी उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे (Other Fee) अर्ज महाडीबीटी पोर्टलवर भरण्यात यावे. सोबत उपरोक्त संदर्भीय शासन पत्रे जोडली आहेत.

कळावे,

आपला विश्वासू

PSPandav

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

E:\Nil\Shashan Table (Parit Sir) (Repaired) 1.docx

# Association of the Managements of Un-aided Professional Colleges (Maharashtra)

**(Reg. No. MH / 8081 / 2003 / Nashik, dtd. 27/05/2003)**
C/o. K K Wagh Education Society, Amrutdham, Panchavati, **NASHIK** - 422 003, Maharashtra
Phone No. : (0253) 2221118, 2629048 | WhatsApp No. : 8888604600
Email : office@professionalassociation.org.in | info@professionalassociation.org.in
Website : www.professionalassociation.org.in


जा. क्रं. प्रोफेशनल असोसिएशन/ २३४/२०२५ दिनांक: ०३/०६/२०२५

प्रति,
मा. कुलसचिव सो.,
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापुर-४१६००४.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली च्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए./बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमांची फी निश्चित करुन मिळणेबाबत...

संदर्भ : १. मा. संचालक सो., तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/१४७, दि.१०/०३/२०२५.
२. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नाशिक यांचे पत्र जा.क्र.तांशि/विकाना/तांशा/२०२५/१२१६, दि. २६/०५/२०२५.

मा. महोदय,

असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड प्रोफेशनल कॉलेजेस् (महाराष्ट्र) (पुर्वीचे असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरींग कॉलेजेस् (महा.))' ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था असुन महाराष्ट्रातील विनाअनुदानित प्रोफेशनल कॉलेजेस् (उदा. अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, टाऊन प्लॅनिंग, डिझाईन, अप्लाईड आर्टस अॅण्ड क्राफ्टस, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स, बॅचलर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स इ.) हे असोसिएशनचे सभासद आहेत. विनाअनुदानित प्रोफेशनल कॉलेजेसचा गुणात्मक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने विविध सेमिनार, कॉन्फरन्सचे आयोजन असोसिएशन मार्फत केले जाते. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, आर्किटेक्चर कौन्सिल ऑफ इंडिया, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, शुल्क नियामक प्राधिकरण, प्रवेश नियामक प्राधिकरण, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष व संबंधित विद्यापीठांकडे संस्थाचालकांचे/ महाविद्यालयांचे विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने असोसिएशन प्रयत्नशील आहे.

<u>वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.</u>

वरील संदर्भीय संदर्भ (१) अन्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. **(Annexure – I) (Page No. 1 to 3)**

१) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरू करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नित आहेत, त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थांमधील अभ्यासक्रमांना त्या पुर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये निर्धारीत केलेले शुल्क आकारण्यात यावे.

२) ज्या संस्थामध्ये सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वीपासून सुरू होते, मात्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने, त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क हे त्या अभ्यासक्रमांना त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये संबंधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

पुढील पानावर...

३) वरील संदर्भीय (संदर्भ क्र. २) पत्रामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवीदिल्ली च्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए./बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने पुढील १५ दिवसांत निश्चित करावयाचे आहे आणि त्याबाबतची माहिती सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करून दयावयाची आहे. संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. **(Annexure – II) (Page No. 4 to 6)**

संदर्भीय (संदर्भ क्र.२) मध्ये असेही नमुद केले आहे, कि दि.१०/०३/२०२५ चे संचालनालयाचे पत्र रद्द करण्यात यावे.

<u>आपणास खालीलप्रमाणे खालीलप्रमाणे विनंती करीत आहोत...</u>

A) वरील संदर्भीय (संदर्भ क्र. २) पत्रामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली च्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए./बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमांचे फी निश्चित करून मिळणेबाबत विनंती.

B) वर (A) मध्ये नमुद केल्यानुसार बी.बी.ए./बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रम प्रोफेशनल अभ्यासक्रम असल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपुर्ती मिळत असते, सदर शुल्क प्रतिपुर्तीचे अर्ज हे महाडिबीटी पोर्टलवर जमा करावे लागतील.

सदर कोर्सेस हे प्रोफेशनल कोर्स असल्यामुळे महाडिबीटी पोर्टलवर खालील नमुद हेड उपलब्ध आहेत.

**I) Tuition Fees**
**II) Development Fees**
**III) Exam Fees**

आपणांस विनंती की, शुल्क निश्चिती करतेवेळी वर नमुद हेड प्रमाणे करावी, की जेणेकरून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाडिबीटी पोर्टलवर अर्ज भरतेवेळी अडचण निर्माण होणार नाही.

वरील प्रमाणे विनंती.

आभारी आहे.

Association of the Managements of Un-aided Professional Colleges (Maharashtra) Reg. No. MH/8081/2003/Nashik dtd.27/05/2003

आपला विश्वासू,

(प्रा. के.एस.बंदी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंटस् ऑफ अन-एडेड प्रोफेशनल कॉलेजेस् (महाराष्ट्र)

सोबत:- **Annexure – I & II**

**Annexure I**

महाराष्ट्र शासन

## तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पोस्ट पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७९६८

ई-मेल: desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.- १८/तंशिरा/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ९४७

दिनांक- १०/०३/२०२५

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए. एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दि. ७.८.२०२४

२) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शिक्षवृ-२०२४/प्र.क्र.२५२/तांशि-४, दि. ३.२.२०२५

३) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.६.३.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी शै वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत (As and Where ) परिषदेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये तसेच तदनंतरही बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शासन

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, नाशिक
दि. 11 MAR 2025
आवक क्र. 1199

सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

येथे नमूद करण्यात येते की, संदर्भाधीन दिनांक ३.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत वरील अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शासनाडिबीटी योजनेतून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून ते प्रशासकीय कारणास्तव व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून विलंबाने घोषित झाले आहेत. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क प्रथमच शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करावयाचे आहे. मात्र सदर अभ्यासक्रमांच्या संस्थांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हा संक्रमण कालावधी असल्यामुळे शुल्क नियामक प्राधिकरणाच्या विनंतीच्या अनुषंगाने या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन पत्र दिनांक ६.३.२०२५ अन्वये मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्राप्त आदेशानुसार केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्यानुषंगाने डिबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीबद्दल खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE च्या मान्यतेनुसार नव्याने सुरु करण्यास प्रथमतः मान्यता देण्यात आली आहे, अशा अभ्यासक्रमांना ते ज्या विद्यापीठास संलग्नित आहेत, त्या विद्यापीठाने अशा प्रकारच्या इतर संस्थांमधील अभ्यासक्रमांना त्या पुर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये निर्धारित केलेले शुल्क आकारण्यात यावे.
२) ज्या संस्थांमध्ये सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वीपासून सुरु होते. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ते AICTE अंतर्गत आल्याने,त्यांना शासन मान्यता देण्यात आली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी आकारावयाचे शुल्क हे त्या अभ्यासक्रमांना त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मध्ये संबंधित विद्यापीठाने आकारलेल्या शुल्का इतकेच आकारण्यात यावे.

संदर्भ क्र. ३ नुसार बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित होऊन या अभ्यासक्रमांना शासनाची शिष्यवृत्ती योजना लागू केली असून डिबीटी पोर्टलवर या संस्थांचे शुल्क नोंद करणे अनिवार्य आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे शुल्क

आकारण्याच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांकरिता संस्थांचे (नवीन अथवा जुन्या संस्था) शुल्क डिबीटी पोर्टलवर मंजूर करताना सहसंचालक, विभागीय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, संबंधित संस्थेकरिता विद्यापीठांकडून प्रमाणित करण्यात आलेले शुल्क तात्पुरते शुल्क (Ad Hoc Fee) म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ग्राह्य धरावे व याकरिता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय सहसंचालक कार्यालयाची असेल याची नोंद घ्यावी. तसेच याबाबत सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना याबाबत अवगत करावे.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती स्तव:

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना
२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना
३. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहिकरिता:

१. सर्व प्राचार्य, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड संस्था

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२२०४०१३५ Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४ दिनांक : २० मे, २०२५.

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व संबंधित अकृषि विद्यापीठे.

२) कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड.

३) सर्व सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये AICTE च्या अखत्यारित आलेल्या बी.बी.ए., बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत....

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. हे अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. या बाबी विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. या अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने पुढील १५ दिवसात निश्चित करुन, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार संबंधित सहसंचालक यांनी उपरोक्त अभ्यासक्रमांच्या शिष्यवृत्तीबाबतची आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी व त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

(संतोष खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

४) निवडनस्ती (तांशि-४)